International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Commerce & Economics
Organized by R. V. Belose Education Foundation Dapoli
N. K. Varadkar Arts, R.V. Belose Commerce College, Dapoli
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com

# कृषी पर्यटन : कृषी उत्पन्नाची नवी दिशा

**Dr. Dinesh Yadavrao Parkhe**

Head dept. of Economics, Patpanhale Arts, Commerce and Science College, Tal-Guhagar Dist-Ratnagiri., Pin code no-415724

**प्रस्तावना**

कृषी पर्यटन ही संकल्पना आजच्या काळात फार महत्वाची ठरत आहे. शहरी जीवनातील धावपळीतून आणि प्रदुषणातून काही वेळ विश्रांती मिळावी,यासाठी अनेक जण वेगवेगळ्या ठिकाणी फिरायला जातात.ग्रामीण भागातील शेती आणि निसर्गरम्य स्थळाला भेट देण्याकडे लोकांचा कल वाढला आहे. यातूनच कृषी पर्यटनाची संकल्पना उदयास आली. याचवेळी शेतकऱ्यासाठी त्यांच्या उत्पन्नाचे नवीन स्रोत निर्माण करण्याची गरज आहे या दोन्ही गरजांना एकत्र आणणारी संकल्पना म्हणजे "**कृषी पर्यटन**" होय.

**कृषी पर्यटन म्हणजे काय? :-** कृषी पर्यटन म्हणजे शेतकऱ्यांच्या शेतावर किवा त्याच्या आसपासच्या परिसरात पर्यटकांना काही दिवसासाठी राहण्याची आणि ग्रामीण जीवनाचा अनुभव घेण्याची संधी देणे. यात पर्यटकांना शेती,पशुपालन,स्थानिक संस्कृती आणि खाद्य पदार्थ याचा अनुभव घेता येतो.

आज जागतिकीकरणाच्या काळातही शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो.देशातील जवळजवळ ५५ ते ६० टक्के लोकसंख्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष पणे शेतीवर अवलंबून आहे तर देशाच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचा वाट घटत असला तरी त्याचे महत्व कमी झालेले नाही तसेच शेती व्यवसायात उत्पन्न वाढीचे जास्तीचे कार्यक्रम राबविले तर त्यामुळे देशाच्या उत्पन्नात शेताचा वाटा वध्य शकतो.त्यासाठी कृषी पर्यटन हा एक कार्यक्रम उपयुक्त ठरेल.पर्यटन हे रोजगार निर्मिती,दारिद्र्य निर्मूलन व शाश्वत विकासाचे महत्वाचे साधन मानले जाते. याशिवाय पर्यटनामुळे राष्ट्रीय एकात्मता,आंतरराष्ट्रीय तणाव,स्थानिक हस्तव्यवसाय व सांस्कृतिक कार्यक्रम यांना बळकटी मिळते. आतापर्यंत लाखो परदेशी पर्यटकांनी भारतातील पर्यटन स्थळाला भेटी दिल्या.यातून कोट्यावधी रुपयाचे परकीय चलन मिळत आहे.देशांतर्गत पर्यटनाला चालना देण्यासाठी पायाभूत सुविधांचा विकास,उत्पादन वाढ व विविधीकरण ,सास्कृतिक सादरीकरण,कमी खर्चातील राहणीमान सुविधा,मानव संसाधन विकास,लोकांमध्ये जागृती व त्यांचा सहभाग वाढविणे. कृषी पर्यटनाला चालना देण्यामध्ये कृषी मंत्रालय,केंद्र व राज्य सरकार मधील पर्यटन विभागाचे संबधित अधिकारी,शेतकरी या सारखे काही महत्वाचे घटक आहेत.तसेच कृषी पर्यटनाच्या विकासासाठी ग्रामीण पर्यटन,जैविक पर्यटन,आरोग्य पर्यटन,साहस पर्यटन हे खेडे,शेती व

शेतकरी यांना उत्पन्न प्राप्तीचा एक पूरक मार्ग उपलब्ध होवू शकतो.शेतकऱ्यांना त्यांच्या पिढीजात मालकीच्या शेती बरोबरच पर्यटकांना सोयीची व पर्यटनाच्या दृष्टीने प्रसिद्ध असलेली अनेक स्थळे कृषी पर्यटन केंद्र म्हणून विकसित करता येईल.

१६ मे हा दिवस जागतिक कृषी पर्यटन दिन म्हणून साजरा केला जातो.कृषी पर्यटन हि संकल्पना मुळची ब्राझील,ऑस्ट्रेलीया व न्यूझीलंड या देशामधील आहे.भारतासारख्या कृषी प्रधान देशात कृषी पर्यटन हि संकल्पना सध्या मोठ्या प्रमाणात रुजू लागली आहे.जागतिक पर्यटन आणि प्रवास परिषदेच्या(WTC) अहवालानुसार पर्यटन व्यवसायाने भारतात २२.३ दशलक्ष रोजगार उपलब्ध करून दिले आहेत.भारतासारख्या कृषी प्रधान देशात या व्यवसायाला चांगला वाव आहे.कृषी पर्यटन विकास संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक श्री.पांडुरंग वावरे यांच्या कल्पक बुद्धीतून २००४ साली बारामती (पुणे) येथे साकारलेल्या पहिल्या धाडसी कृषी पर्यटन प्रकल्पातून महाराष्ट्रात कृषी पर्यटन व्यवसायाला सुरवात झाली.कृषी पर्यटनाचा विकास व विस्तार होण्याच्या दृष्टीने ऑगस्ट २००५ मध्ये कृषी पर्यटन आणि विकास संस्थेची(ATDC) स्थापना करण्यात आली.कृषी पर्यटनाच्या माध्यमातून राष्ट्र विकासाला चालना मिळावी देशी विदेशी पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी कृषी पर्यटन हे चांगले मध्यम आहे.अर्थातच हा कृषी पर्यटन व्यवसाय सर्वांच्या नजरेस आणून देण्याचे काम या संस्थेच्या माध्यमातून केले जात आहे.महाराष्ट्रातील विविधतेने नटलेल्या पश्चिम महाराष्ट्र घाट माथा, विदर्भ,मराठवाडा आणि कोकण या विभागाची त्यांच्या नैसर्गिक,धार्मिक,सांस्कृतिक विविधतेमुळे देश विदेशात वेगळी ओळख आहे त्याची सखोल माहिती उपलब्ध व्हावी व दुसऱ्या बाजूला शेतकरी,शेती व्यवसाय आणि त्या भागातील लोकांचे उत्पन्न वाढावे या उद्देशाने अभ्यासकाने “कृषी पर्यटन: कृषी उत्पन्नाची नवी दिशा” या लेखाद्वारे प्रयत्न केला आहे

**मुख्य शब्द:-** पर्यटन,शेती व्यवसाय,मानवी जीवन,ग्रामीण जीवन आणि ज्ञान.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :-**

१. कृषी पर्यटनाचे महत्व अभ्यासणे.

२. कृषी पर्यटनातील समस्यांचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती :-** संशोधनाच्या अभ्यासासाठी पूर्णपणे प्राथमिक व दुय्यम संकलन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. यात काही शेतकऱ्याच्या प्रत्यक्ष मुलाखती घेण्यात आल्या त्याच बरोबर विविध वर्तमान पत्रे ,पुस्तके,मासिके आणि इन्टरनेट वरील वेबसाईट चा वापर करण्यात आला आहे.

**कृषी पर्यटन संकल्पना -** जागतिक कृषी पर्यटन आणि वाहतूक परिषद हि एक महत्वाची आंतरराष्ट्रीय परिषद आहे जी कृषी पर्यटन आणि वाहतूक क्षेत्रातील तज्ञांना एकत्र आणते. या परिषदेत कृषी पर्यटन आणि वाहतूक क्षेत्रातील नवीन ट्रेंड,समस्या आणि संधीवर चर्चा करत असते.या परिषदेने कृषी पर्यटना संदर्भात काही तत्वे सांगितली आहेत ती पुढीलप्रमाणे:-

१. कृषी पर्यटन हे पर्यटकांना प्राणी,पक्षी,शेती व निसर्ग या सारख्या काही गोष्टी पाहण्यासाठी संधी देते.याशिवाय संस्कृती,तेथील लोकांचे पेहराव,सण उत्सव व ग्रामीण खेळ यामुळे कृषी पर्यटकांचा आनंद द्विगुणीत होतो.

२. शेती विषयक कार्यातही पर्यटकांना सहभागी होता येते.त्याचबरोबर पोहणे,बैलगाडी चालविणे,हुर्डा पार्टी,उंटावर व म्हशीवर बसून प्रवास करणे,शेतात न्याहारी करणे यासारख्या गोष्टीमध्ये पर्यटक सहभागी होवून प्रयत्नाचा आनंद घेतात.

३. ग्रामीण हस्तव्यवसातील,ड्रेस मटेरियल्स,शेतातील ताजी उत्पादने इ.ची पर्यटक एक आठवण म्हणून खरेदी करू शकतात.

थोडक्यात सहभाग युक्त पर्यटन हि संकल्पना कृषी पर्यटनाद्वारे पर्यटकांना आनंद देवू शकते. अर्थातच कृषी पर्यटन हि एक नाविन्य संशोधित संकल्पना आहे त्यात पर्यटकासाठी नवनवीन बदल करून आकर्षित केले जाते. आपल्या शेती व्यवसायातून अधिक उत्पन्न मिळविण्यासाठी व पर्यटकांना ग्रामीण भागाकडे आकर्षित करण्याच्या हेतूने शेतकरी आणि ग्रामीण जनता यांच्याकडून दिल्या जाणाऱ्या सोयी सुविधा व सेवा स्वरूपाच्या अनेक नवनवीन कृती म्हणजे कृषी पर्यटन होय.

**कृषी पर्यटनाचे महत्व:-**

**१. कृषी पर्यटन व शैक्षणिक मूल्य :-** अनेक पर्यटक मनोरंजनाबरोबरच शैक्षणिक सहलीचे आयोजन देखील करतात यामध्ये कृषी क्षेत्रातील संशोधक,अध्यापक,विद्यार्थी,कृषी माल खरेदी विक्री व्यवसायिक,कृषी क्षेत्राशी संबधित नसलेले नागरिक,शहरातील पर्यटक इ.चा समावेश होतो.यातील काहींचा उद्देश अधिक ज्ञान प्राप्त करणे असतो तर काहींचा उद्देश कृषी क्षेत्रा विषयी जिज्ञासा,ग्रामीण शेतकऱ्यांची जीवन शैली व शेतीच्या सर्व कामाचा जवळून अनुभव घेणे हा असतो.कृषी पर्यटनामध्ये मनोरंजन होईल अशा प्रकारे माहिती दिली गेली पाहिजे उदा.शेणापासून गोबर गॅस,बायोगॅस,गांडूळ खत,हिरवळीचे खत,अश्वगंधा,कोरपड,तुळस,रुई,दगडी पाला इ.चा परंपरागत पद्धतीने रस काढणे,मधुमक्षिका पालन,फुलांचे परागीकरण,प्राणी व पक्ष्याच्या सहाय्याने बीजवहन,कीड व्रोग नियंत्रण पद्धती,मस्य शेती,अनेक शेतमाल प्रक्रिया उद्योग उदा.केळी चिप्स,मँगो पल्प,बांबूच्या

खुर्च्या,हस्तकलेच्या वस्तू,शोभेच्या वस्तू,लाकडी खेळण्याचे उद्योग,उसाचे रसवंतीगृह,रेन वाटर हर्वेष्टिंग द्वारे शेत तळ्यात साठविल्या जाणाऱ्या पाण्याच्या ठिबक सिंचनाद्वारे शेतात वापर,तुषार व धुके तयार करणाऱ्या फॉगेन्सचा वापर व त्याचे प्रात्यक्षिक तसेच रात्रीचेवेळीकाजवा,सौरदिवेइ.चाइगमगाट,सरपटनाऱ्याप्राण्यांच्या,फुलपाखरांच्या,फुलांच्या विविध जाती,शेळी-मेंढी पालन,इमूपालन,रेशीम उत्पादन,रोप वाटिका,विविध फळे,भाजीपाला व अंतर्गत पिकाची लागवड पर्यटकांना दाखविणे,कलमांची बांधणी पद्धती,पिकांची कापणी पद्धती,फळे व भाजीपाल्याची प्रतवारी,विक्री साठीची पॅकिंग पद्धती इ. प्रात्यक्षिके पर्यटकांना दाखविता येणे शक्य असते त्यामुळे शेती क्षेत्राकडे पर्यटकांचा ओघ निश्चित वाढेल.

२. **मनोरंजनातून संस्कृतीची ओळख :-** शहरातील रोजच्या धकाधकीच्या जीवनाला कंटाळलेल्या नागरी लोकांना महिन्याच्या शेवटी निसर्गाच्या सानिध्यात प्रदूषण मुक्त शांत वातावरणात ज्या ठिकाणी मनोरंजनाबरोबरच संस्कृतीची जोपासना व ओळख होईल.निसर्ग जवळून अनुभवता येईल अशा वातावरणाची आवश्यकता असते. या सर्वांचा शेतकऱ्यांनी उपयोग करून घेतला पाहिजे. यासाठी शेतकऱ्यांनी पर्यटकासाठी सायंकाळी जेवणानंतर मनोरंजनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करावे ज्यामध्ये भजन,कीर्तन,भारुड,ग्रामीण जीवनातील गाणी,नृत्ये,गोंधळ,धनगरी ओव्या,धार्मिक व पौराणिक नाटक तसेच ग्रामीण सण,उत्सव,जत्रा,मेळावे,ग्रामीण पोशाख,धार्मिक विधीची ओळख करून देता येईल.

३. **ग्रामीण खाद्य संस्कृतीचा परिचय:-** पर्यटकांना त्यांची सहल अविस्मरणीय व्हावी यासाठी ग्रामीण खाद्य संस्कृतीची वेगळी ओळख करता येईल यासाठी पर्यटकांना ग्रामीण पद्धतीच्या स्वादिष्ट जेवणाची मेजवानी घेता येईल यामध्ये विविध धान्य प्रकारची भाकरी (नाचणी,ज्वारी,बाजरी,तांदूळ व मका )तसेच उकडीचे मोदक,खान्देशातील पुरण पोळी (खापरावरचेमांडे)ग्रामीणभागातीलवैशिष्ट्यपूर्णभाज्या(केळफुल,फणस,शेवगा,करटूली,माठ,घेवडा,मुळ्याची भाजी ) कोथिंबीर व अळू वडी,वांग्याचे भरीत,वरण बट्टी,मिरचीचा खर्डा,रायते,सोलकढीइ.याबरोबरचपाट्यावरवाटलेलीकैरीची,करवंदाची,मिरचीची,शेंगदाण्याची,तीळीची,जवसाची चटणी,पापडाचे,लोणच्याचे विविध प्रकार इ. खास गावपण जपणारे पदार्थ शक्य असल्यास त्यांच्या समोर चुलीवर बनवू शकतात.जेवण वाढण्याची व्यवस्था स्वच्छ जागेत गवताने साकारलेल्या,सारवलेल्या अंगणात,गर्द हिरव्या झाडाखाली,आमराईत,नारळी पोफळीच्या बागेत, समुद्र किनारी तसेच शक्य असल्यास माचनी सारखे टेबल खुर्च्यांची भोजनासाठी व्यवस्था करता येईल.

४. **ग्रामीण खेळ व निसर्गाचा अनुभव :-** पर्यटकांसाठी वेगवेगळ्या प्रकारच्या गावरान खेळाचे आयोजन करता येते.परिसरातील फळभागा,फुलभागा,आमराई,नर्सरी,पावसाळ्यातील धबधबे,धरणाचे बॅक वाटर

याची सफर घडविता येते.त्यावेळी पर्यटकांना आंबा,काजू,पेरू,फणस,आवळा,बोर,करवंदे,सीताफळ,रामफळ,जांभूळ,कोकम इ. रानमेवा स्वतःच्या हातानी तोडून खाण्याचा मुक्त आनंद घेता येतो.त्याच बरोबर झाडाचे झोपाळे,झाडावर चढणे,मासेमारी,बोटिंग,पक्ष्यांना खाऊ घालणे,गुरांना चारा टाकणे,विहिरीत तळ्यात पोहणे अशा प्रकारचे अविस्मरणीय अनुभव त्यातून घेता येतात.

५. **ग्रामीण मुलभूत सुविधांमध्ये वाढ :-** कृषी पय्र्त्नामुळे गावाशी नाळ तुटलेल्या शहरातील लोकांना ग्रामीण भागाविषयी ओढ वाटू लागली आहे आज अनेक शहरी पर्यटक सुट्टी आनंदात घालविण्यासाठी कृषी पर्यटनाला पसंती वाढत आहे.पर्यटकांच्या ग्रामीण भागातील वाढणाऱ्या रहदारीमुळे रस्ते,रस्ते सुरक्षा,पाणी,वीज,बँका इ.मध्ये सुधारणा व वाढ करणे सरकारला गरजेचे वाटत आहे.कृषी पर्यटनामुळे भूमी पुत्राबरोबरच ग्रामीण भागातील लोकांच्या,समाजाच्या राहणीमानामध्ये,सोयी सुविधांमध्ये वाढ होत आहे.

६. **कृषी पर्यटन रोजगाराची नवी दिशा :-** भारतीय शेतीचे निसर्गावरील अवलंबित्व व निराशाजनक स्थिती पाहता जर शेतीला व्यावसायिकतेची जोड दिल्यास ग्रामीण भागात रोजगाराच्या मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध होतील. कृषी पर्यटनामुळे पर्यटकाच्या संख्येत वाढ होत आहे पर्यायाने स्थानिक शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात निवास,भोजन,शेती उत्पादनाची विक्री इ. मध्ये रोजगाराची संधी वाढत आहे.हरितगृहे,नर्सरी या सारख्या सुधार्नामुळे ग्रामीण भागातील तरुण विशेषतः कृषी पदवीधरांना रोजगार प्राप्त होवू शकतो. कृषी पर्यटन विकासाबरोबरच रस्ते,पाणी,वीज,वाहतूक,बँकिंग व आरोग्य व्यवस्था इ. मुलभूत सुविधा आवश्यक असल्याने या सर्वांमध्ये मोठ्या प्रमाणात ग्रामीण रोजगार निर्माण होवू शकतो.त्याचप्रमाणे निसर्ग तज्ञ,मार्गदर्शक इ. ना रोजगार निर्माण होतील अनेक दुय्यम सेवा व जोडधंदे सुरु करण्यास उत्तेजन मिळू शकते उदा. भाजीपाला प्रक्रिया उद्योग,वाहतूक सेवा मधूनही रोजगार निर्माण होईल. देशी-विदेशी पर्यटकांची ये-जा वाढल्याने बँकिंग क्षेत्रात वाढ होवून त्या ठिकाणी रोजगार निर्माण होईल.

**कृषी पर्यटन व्यवसायासमोरील आव्हाने/समस्या :-**

कृषी पर्यटना समोर अनेक आव्हाने अगर समस्या आहेत.त्यात कृषी पर्यटना विषयी शेतकऱ्यामधील सखोल व पूर्ण ज्ञानाचा अभाव,लहान शेतकऱ्यामधील संवाद कौशल्य व व्यावसायिक दृष्टीकोनाचा अभाव,पर्यटका विषयी अद्ययावत माहितीचा अभाव,शेतकरी व पर्यटका मध्ये संवादाचा अभाव,कृषी पर्यटनासाठी शेतकऱ्या कडे भांडवलाची कमतरता,शेतकऱ्याची कृषी पर्यटना सारख्या जोड व्यवसाय विषयी

अनास्था व दुर्लक्ष,कृषी पर्यटन उद्योगातील असंघटीत क्षेत्राचे अस्तित्व,शेतीचा निकृष्ट दर्जा,सिंचन सुविधांचा अभाव,दुष्काळाशी सततचा सामना इ. समस्यांना शेतकऱ्यांना तोंड द्यावे लागते. महाराष्ट्रातील ४० टक्के तालुके सातत्याने अवर्षण क्षेत्राखाली येतात.

शेती फायदेशीर,प्रगतीशील व प्रयोगशील करायची असेल तर "**शेती पूरक कृषी पर्यटन प्रकल्प**" सारखा पर्याय शेतकरी बंधूंना उत्पन्नासाठी उपलब्ध झाला आहे.आंतरराष्ट्रीय कृषी पर्यटन व कृषी पर्यटन विकास संस्था बारामती यांनी पाहणी केलेल्या अहवालानुसार महाराष्ट्रात अनेक शेतकऱ्यांचे उत्पन्न कृषी पर्यटन प्रकल्पा पासून ३३ टक्क्यांनी वाढले आहे.आज महाराष्ट्रात जवळजवळ ५०० पेक्षा जास्त कृषी पर्यटन केंद्र सुरु आहेत.

## निष्कर्ष

**१.** कृषी पर्यटन हे एक ग्रामीण भागातील शेतकऱ्यासाठी महत्वाचे क्षेत्र आहे ज्यामध्ये आर्थिक विकास आणि रोजगार निर्मितीची क्षमता आहे.
**२.** कृषी पर्यटनाला चालना देण्यासाठी सरकारची भूमिका महत्वाची आहे.
**३.** कृषी पर्यटन आणि वाहतूक क्षेत्रातील स्थिरता आणि पर्यावरण पूरक विकास आवश्यक आहे.
**४.** कृषी पर्यटनासाठी मुलभूत सुविधेत गुंतवणूक वाढविण्याची आवश्यकता आहे.
**५.** शहरी लोकांना ग्रामीण जीवनाचा अनुभव मिळतो.
**६.** कृषी पर्यटना मुळे नैसर्गिक आणि संतुलित जीवन शैलीला प्रोत्साहन मिळते.
**७.** स्थानिक संकृती व परंपरांचे जतन होते.

## शिफारशी

१. कृषी पर्यटन केंद्र सुरु करण्यासाठी योग्य जागा निवडावी.
२. पर्यटकांना आवश्यक सुविधा पुरवाव्यात.
३. शेती आणि पर्यटनाची योग्य सांगड घालावी.
४. कृषी पर्यटनाला चालना देण्यासाठी शासकीय धोरणे व्यवसायाला पोषक असावीत.
५. कृषी पर्यटन केंद्रामध्ये स्वच्छता आणि सुरक्षितता जपावी.
६. स्थानिक लोकांना कृषी पर्यटनात सहभागी करावे.
७. कृषी पर्यटनाच्या माध्यमातून पर्यावरण पूरक विकासाला प्रोत्साहन द्यावे.

कृषी पर्यटनातून एक शाश्वत भवितव्य शेतकऱ्यासाठी आहे. कृषी पर्यटन हे केवळ शेतकऱ्यांसाठीच नाही तर संपूर्ण समाजासाठी एक चांगली संधी आहे यामुळे ग्रामीण भागाचा विकास होतो,लोकांना शुद्ध हवा आणि नैसर्गिक वातावरण मिळते. शहरात आणि गावात एक समन्वय साधला जातो त्यामुळे कृषी पर्यटन कृषी उत्पन्नाची एक नवी आणि शाश्वत दिशा आहे,असे म्हणायला हरकत नाही.

**संदर्श :-**

१. कृषी पर्यटनाची आवश्यकता,प्रभाकर काटेकर,डिसेंबर २००७.
२. समृद्धीचा महामार्ग-कृषी पर्यटन ,रवींद्र काटोले,गोडवा कृषी प्रकाशन.
३. कृषी पर्यटन,चंद्रशेखर भड्सावले ,मे २००७.
४. Jounal of ATDC Varius volumes.
५. Agro-Tourism-Taware Padurang. New revenue stream for farmer through rural-urban reunion financial agriculture vol.42 issue-5 may 2010.
६. Agriculture growth decline in Maharashtra -economic survey report.